## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४१/२०२६ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ४९७ व ५०३ नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे की, तो शाहीन कॉलनी, अकोट,ता. अकोट, जि. अकोला येथील रहिवासी आहे. त्याच्या मालकीची अशोका लेलॅन्ड टिपर क्र. एम. एच. २७–बीएक्स–८०७५ हे अकोट ग्रामीण पोलीस ठाणे यांच्याकडील गुन्हा नोंदणी क्र. १८३/२०२६ गुन्हयाच्या तपास कामी जप्त केलेले आहे. सदर टिपर हे अर्जदाराच्या मालकीचे असुन दैनदिन कामासाठी व उपजिवेकेसाठी आवश्यक आहे. तसेच, सदर वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहील्यास त्याचे ट्युब, टायर वगैरे खराब होण्याची व इतर लोखंडी पाटर्स गंजण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदारास सदर वाहनाचा ताबा मिळण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ५ वर सादर करुन टिपर क्र. एम. एच. २७–बीएक्स–८०७५ वरील चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन रोडवर बंद परिस्थीतीत उभा केला. त्यामुळे मोटारसायकल क्र. एमएची–३०–बीझेड–२४८७ हिने पाठीमागुन धडक दिल्यामुळे अपघात होवुन सदर अपघाता मध्ये अब्दुल हमीद यांचा मृत्यु झाला. सदर टिपर याची दि. १४/०३/२०२६ रोजी यांत्रीक तपासणी करुन घेण्यात आली आहे. योग्य त्या अटी शर्तीवर ताबा देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी यांनी आपला खुलासा सादर करुन तपास अपुर्ण असल्याचे दिसुन येते. योग्य त्या अटी शर्तीवर ताबा देण्यात हरकत नसल्याचे कळविले आहे.

४. अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे अभिलेखावर सादर केले आहेतः–

१) वाहन नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

२) आधार कार्डाची सत्यप्रत.

३) गुन्हा नोंदणी क्र. १८३/२०२६ मधील प्रथम खबरी अहवालची प्रत.

४) वाहन विम्याची प्रत.

५) प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र.

५. सबब, दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकण्यात आले. अर्जाचे व अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार याने सादर केलेल्या वाहन नोंदणी पत्राचे अवलोकन केले असता वाहन क्र. एम. एच. २७–बीएक्स–८०७५ हे नुर कमर हिफजुल कमर म्हणजेच अर्जदार याच्या नांवावर नोंदणीकृत असल्याचे दिसुन येते. अर्जदारा तर्फे वाहन चालक नंदु प्रल्हाद तिडके याचे शपथपत्र सादर करण्यात आले आहे. त्याने वाहनाचा ताबा देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे. त्यावरुन अर्जदार हा प्रथमदर्शनी वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र ठरतो.

६. सदर टिपर ही अपघाताच्या गुन्ह्या संदर्भात जप्त करण्यात आल्याचे स्पष्ट होते परंतु, सदर अपघात हा टिपर चालकाच्या चुकीमुळे झाला असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अर्जदार याने सादर केलेल्या वाहन विम्याचे अवलोकन केले असता तो दि. ०९/०५/२०२५ ते दि. ०८/०५/२०२६ रोजी पर्यंत वैध असल्याचे स्पष्ट होते. अपघात दि. १८/०२/२०२६ रोजी झाल्याचे दिसुन येते. त्यावरुन अपघाताच्या दिवशी वाहनाचा विमा वैध होता असे स्पष्ट होते. *मा.सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील न्यायनिर्णयामध्ये अपघात करणारे वाहनाचा विमा नसल्यास अपघातातबाबतची नुकसान भरपाई खटलयामध्ये मंजुर झाल्यास ते अदा करण्याची हमी दिल्यानंतरच वाहन सोडण्याचा आदेश पारित केला जावु शकतो असे निष्कर्श नोंदवलेले आहे.* अर्जदार याने वाहन विम्याचे कागदपत्र सादर केले आहे व सदर विमा वैध असल्याचे देखिल स्पष्ट होते. अर्जदारा व्यतिरिक्त आजपावेतो इतर कोणत्याही ति–हाईत इसमाने सदर लक्झरी बसच्या ताब्याची मागणी केलेली नाही. तसेच खटल्यातील पुराव्या

दरम्यान वाहनाच्या ओळखीकरिता त्याचे फोटो उपयोगी पडू शकतात. त्यामुळे अर्जदार ही वाहनाचा ताबा मिळविण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे, जप्त वाहनाचे तांत्रीक स्वरुप पाहता, ते कोणत्याही वापराशिवाय एकाच ठिकाणी पडुन राहिल्यास तर ऊन, पाऊस इ. नैसर्गिक कारणांमुळे त्याचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार याने संबंधीत पोलीस ठाणे येथे रु.१५,००,०००/- चे सुप्रुतनामा बंधपत्र सादर केल्यास, त्यास अकोट ग्रामीण पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंदणी क्र.१८३/२०२६ मध्ये जप्त करण्यांत आलेले टिपर क्र. एम. एच. २७-बीएक्स-८०७५ चा तात्पुरता ताबा देण्यात यावा.

३. अर्जदाराने सदर वाहनाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये. तसेच न्यायालयाच्या परवानगी शिवाय त्याची विक्री करु नये.

४. अर्जदार याने वाहना संदर्भातील कागदपत्रे संबंधित पोलीस ठाण्यात द्यावी.

५. तपास अधिकारी यांनी सदर वाहनाचा ताबा देतांना जप्त वाहनाचे सर्व बाजुने फोटो काढुन तसा रितसर पंचनामा करावा व तसे सुप्रूतनामा, बंधपत्राची प्रत, फोटो व पंचनाम्याची प्रत या खटल्यात दाखल करावी.

( ए. एच. शेख )
**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,**
**(न्यायालय क्र. १), अकोट.**

दिनांकः १७/०३/२०२६.